# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१२/१०/२०१८
## दि.११/१०/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे २०२/१८,भादविक ३९४,५०६,३४१,३४ |
| **फिर्यादी** | रविद्र जाधव,वय-३४ वर्ष,रा.शात्रीनगर कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/१०/२०१८ रोजी ०१/३० वा.चे सुमारास ज्ञानप्रबोधनी सदाशिव पेठ,पुणे येथुन अनारसे समोसेवाले यांचा स्टॉल ते पुना हॉस्पीटल जवळील पुल,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी फिर्यादी हे पेट्रोल भरणेकामी ज्ञानप्रबोधनी सदाशिव पेठ,पुणे येथुन अनारसे समोसेवाले यांचा स्टॉल येथुन जात असताना,फिर्यादी यांनी गाडीवरुन थुंकल्याचे कारणा वरून,त्यांचे मागुन येणा-या यातील नमुद तीन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांना आमचे अंगावर का थुकला असे म्हणुन त्यांना आडवुन,त्यांचे अंगावर धावुन जावुन,त्यांना दमदाटी करुन,हाताने मारहाण केली. त्यावेळी फिर्यादी हे तेथुन पळुन गेल्यानंतर त्यांनी फिर्यादी यांचे गाडीचा पाठलाग करुन,फिर्यादीस पुना हॉस्पीटल पुलावर अडवुन,त्यांना कोयत्याने मारहाण करुन फिर्यादी यांचे डाव्या हाताचे पंज्याचे बोटावर गंभीर दुखापत करुन,तसेच उजव्या खांदयावर व उजव्या गुडघ्यावर कोयत्याने जखम केली. तसेच फिर्यादी यांचा मोबाईल व गाडीची चावी जबरदस्तीने काढुन घेवुन पळुन गेले. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, एस.बी.जोशी ९८५०६६४८४५ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ४०४/१८,भादविक ३२४,३२३,३४२,१४३,१४७,१४९,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-३७ वर्षे,रा.सैय्यदनगर,हडपसर,पुणे |
| **आरोपी** | एकुण सात ते आठ इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/१०/२०१८ रोजी सकाळी ०७/३० वा.ते ०८/०० वा.चे दरम्यान सैय्यदनगर गल्ली नंबर २३ चे समोर हडपसर,पुणे ते आयडीयल एज्युकेशन सोसायटीचे खोली मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे प्रेस रिपोर्टर असुन,त्यांचे भावाचे न्युज चॅनल असुन त्याचे ते संपादक आहेत. ते त्यांचे मुलांना आयडीयल एज्युकेशन सोसायटीचे शाळेत सोडुन परत येत असताना यातील नमुद इसमांनी त्यांना किडनॅप करुन,सदर शाळेचे एका खोलीमध्ये बेकायदेशीरपणे कोंडुन,शाळेच्या भोंगळ कारभारामुळे वरिष्ठ अधिका-यांना तक्रारी केलेल्या असल्याच्या कारणावरुन त्यांना लाठ्या-काठ्यांनी बेदम मारहाण करुन जबर जखमी केले असुन,त्यांचेवर सरकारी दवाखान्यात उपचार चालु आहेत. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. ए.ई.शेटे ९१५८८११६६६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ४०३/१८,भादविक ३६३,५११ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३२ वर्षे,रा.कोंढवा,पुणे |
| **आरोपी** | १.एक महिला,वय-४० वर्षे,रा.खडकी,पुणे २.अकिल इब्राहीम शेख,वय-४७ वर्षे,रा.सदर ३. नईम गऊस शेख,वय-३० वर्षे,रा.कोंढवा,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/१०/२०१८ रोजी १४/०० वा. क्रुट मेमोरीयल स्कुल गेट जवळ आझादनगर,वानवडी पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद महिला व इसमांनी फिर्यादी यांची पीडीत मुलगी अल्पवयीन मुलगी,वय-११ वर्षे हिस पळवुन घेवुन जाण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. डी.व्ही.गुर्जर ९६५७०६८८०१ |

४

**पो.स्टे.गुरनं./कलम** बंडगार्डन पो स्टे २९९/१८,भादविक ४२०

**फिर्यादी** एक महिला,वय-२४,रा.साधु वासवानी चौक,पुणे

**आरोपी** एकुण चार इसम व महिला बनावट नांव सांगणारे खातेधारक व मोबाईलधारक (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०४/०८/२०१८ रोजी ते दि.०९/१०/२०१८ रोजीचे दरम्यान फिर्यादी यांचे राहते घरी

**तपशिल** यातील नमुद बनावट नांव सांगणारे चार इसम व महिला खातेधारक व मोबाईलधारक यांनी फिर्यादी यांना एका नामांकीत खाजगी बँकेत चांगले पगाराची नोकरी लावण्याचे अमिष दाखवुन,त्यांचे खात्यावर वेळोवेळी एकुण ५४,०००/- रूपये भरण्यास सांगुन,फिर्यादी यांची फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. पी.एस.स्वामी ९५५२५२२५४३

५

**पो.स्टे.गुरनं./कलम** येरवडा पो स्टे ७३५/१८,भादविक ३६३

**फिर्यादी** विष्णु कोळपे,वय-५९ वर्ष,रा.संघर्ष चौक,चंदननगर,पुणे

**आरोपी** अज्ञात इसम

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०८/१०/२०१८ रोजी १६/०० वा.पंडीत जवाहरलाल नेहरु उदयोग केंद्र येरवडा,पुणे येथे

**तपशिल** यातील पंडीत जवाहरलाल नेहरु उदयोग केंद्र,येरवडा,पुणे या केंद्रात एकुण पाच विधी संघर्षीत बालक बालकांना फिर्यादी यांचे संस्थेचे आवारात खेळण्यासाठी व कामासाठी काढले असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने,सदर विधीसंघर्षीत बालकांना फिर्यादी यांचे संमती शिवाय त्यांचे कायदेशीर रखवालीतुन,त्यांची नजर चुकवुन पळवुन नेले आहे. सदर मुलांचा शोध घेतला असता,ते मिळुन न आल्याने,त्यांना फुस लावून पळवुन नेले आहे. (फिर्यादी यांनी विधीसंघर्षीत बालाकांचा शोध घेवुन,त्यांचे अधिक्षक साहेब यांचेशी चर्चा करून,आज रोजी तक्रार दिली आहे.)

**त.अंमलदार** सहा.पो.निरी. गिरमकर ८८५०१२ ६०९०

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**